सकाळ

# ऑनलाइन ॲपमुळे सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ

## श्रावणी गोरे : कबनूरकर स्कूलमध्ये जागृती कार्यक्रम

साखरपा, ता २३ : आजकाल वाढत असलेल्या ऑनलाइन ॲप आणि इंटरनेट सुविधांमुळे सायबर क्राईमचे प्रकार वाढत आहेत. याची जाणीव आणि माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी कबनूरकर स्कूलमध्ये एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात आयटी विषयात पदवी शिक्षण घेणाऱ्या श्रावणी गोरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



साखरपा : सायबर क्राईमबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्रावणी गोरे.

सायबर क्राईम म्हणजे काय याची माहिती गोरे यांनी विद्यार्थ्यांना दिली. त्या म्हणाल्या, आजकाल बऱ्याच विद्यार्थ्यांचे स्वत:चे फोन असतात किंवा पालकांचे फोन विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर वापरत असल्यामुळे त्यांच्याबाबत अशा प्रकारचे गुन्हे नकळत घडण्याची शक्यता आहे. अपरिचित फोन, व्हिडिओ कॉल, अपरिचित नंबरवरून येणाऱ्या विनंत्या याबाबत विशेष जागरूक राहिले पाहिजे. मोबाइलच्या कॅमेऱ्यावर हात ठेवून बोलणे, आधी समोरच्याला बोलू देणे अशा प्रकारची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मोबाइलवर येणाऱ्या फेक न्यूजवर तत्काळ विश्वास न ठेवता त्यांची सत्यता पडताळून पाहावी. सध्या फोटोमॉर्फिंग मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे त्याबाबतही विद्यार्थ्यांनी जागरूक राहणे आवश्यक आहे. कोणतीही वेबसाइट सुरू करण्यापूर्वी ती सुरक्षित असल्याची खात्री करणे गरजेचे आहे. त्यासाठी एचटीटीपीने सुरू होणाऱ्या साईटपेक्षा एचटीटीपीएसने सुरू होणाऱ्या वेबसाइट पाहा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन शिक्षिका शिल्पा होनाळे यांनी केले. पाचवी ते दहावीचे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.